# पश्चिम विदर्भातील धनगर समाजाच्या राजकीय स्थितीवर आधुनिकीकरणाचा प्रभाव

**आर.एच. खंदारे**
*श्री. आर.जी. राठोड कला विद्यान महाविद्यालय, मुर्तिजापूर*

**प्रा. डॉ. एच.यु. पेटकर**
*कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, चिखलदरा*

**प्रस्तावना**

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या समाजाला उद्देशून म्हटले होते की तुम्ही तुमच्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की आम्हाला या देशाची शासनकर्ती जमात बनायचे आहे. लोकशाहीमध्ये सत्ता फार महत्त्वाचे असते सत्य शिवाय कोणतेही कार्य पूर्ण होऊ शकत नाही सत्ता मिळवण्यासाठी राजकीय संघटन गरजेचे असते त्याशिवाय सत्ता मिळवता येत नाही राजकीय संघटन मजबूत करण्यासाठी सर्व समाज सदस्यांचे एकत्रित करून गरजेचे असून सर्वांना सोबत घेऊन जाणारा नेता देखील तेवढाच महत्त्वाचा असतो अर्थात नेतृत्व ज्या समाजाचे जेवढे प्रभावी असेल तेवढा तो समाज सत्तेत सहभागी होऊन त्या समाजाच्या समस्या तो सोडू शकतो अर्थातच त्या समाजाचा विकास त्यावर अवलंबून असतो परंतु भारताला स्वातंत्र्य मिळून 57 वर्षे उलटूनही धनगर समाजात एक छत्री प्रभावी नेतृत्व निर्माण होऊ शकले नाही ही समाजाची खंत म्हणावं लागेल आजच्या एकविसाव्या युगात धनगर समाज उपेक्षित अशिक्षित शोषित अंधश्रद्धाळूवादी व परंपरावादी राहिलेला आहे समाजावर व समाजातील महापुरुषांवर पाहिजे त्या प्रमाणात लेखन कार्य झालेले नाही राजश्री मल्हारराव महाराणी गौतमाबाई शूरवीर खंडेराव राजे मालेगाव होळकरांपासून ते लोकमाता अहिल्यामाई तुकोजी यशवंतराव होळकर घराण्यापर्यंतचा काळ हा धनगर समाजास अभिमानाचा अस्मितेचा गौरवाचा नक्कीच ठरावा यातील मात्र शंका नाही एकेकाळी शासनकर्ती जमात असणाऱ्या होळकर घराण्यातील शूरवीरांच्या वंशातील रक्त वाहत असलेल्या धनगर समाजाला आज राजकीय नेतृत्व मिळत नाही ही एक शोकांतिका आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात जो समाज आपला इतिहास विसरतो तो समाज कधीच इतिहास घडू शकत नाही आणि प्रगतीपथावर देखील पोहोचू शकत नाही धनगर समाजाचा दैदिप्यमान इतिहास या जमातीतील लोकांना माहीत झाला नाही किंवा ते माहीत होऊ दिला नाही त्यामुळे या जमातीची प्रगती होऊ शकली नाही भारतीय संस्कृती आणि इतिहास हा अतिशय प्राचीन आहे हिंदू धर्म व संस्कृतीमध्ये अनेक धर्मपंथ निर्माण झालेले आहेत हिंदू धर्मात निर्माण झालेल्या अनेक जातींमध्ये श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद निर्माण झालेला आहे त्यातही काही जाती प्रगत आहेत तर काही जाती या सर्वच दृष्टीने मागासलेले आहेत भारतावर परकीयांनी राज्य करताना या जातीव्यवस्थेला खतपाणी घालून फोडा आणि राज्य करा या नीतीचा अवलंब करून राज्य केले व ते टिकवले स्वातंत्र्यानंतर पुन्हा राजकारणांनी आपले राजकारण साबूत ठेवण्यासाठी सातव्यवस्थेला खतपाणी घालण्याचे काम केले त्यामुळे आजही भारतात जातीव्यवस्था टिकून आहे आजही भारतात काही भटक्या जाती जमाती अशा आहेत की त्या आपल्या भटक्या अवस्थेतच आहेत महाराष्ट्रात भटक्याने विमुक्त जमातींची एकूण संख्या 42 एवढी आहे त्यापैकी 14 जमाती ह्या विमुक्त वाढता जमाती या भटक्या जमाती म्हणून ओळखल्या जातात या 42 जमातींचा तत्सम किंवा पोटजातींची संख्या सुमारे 200 पेक्षा अधिक आहे या सर्व पोटजाती या एकमेकांपासून वेगळे आहेत त्यांचे जीवनशैली जात पंचायत शिक्षेचे प्रकार हे वेगवेगळे असल्याचे दिसून येते ह्या जाती स्थिर स्वरूपात जीवन जगत नाही नेहमी भटकंती करतात ज्या ठिकाणी थांबायचे त्या ठिकाणी स्वतःचे पाल ठोकतात व झेंड्याचे निशाण उभारतात व राहतात यामध्ये पशुपालक एक महत्त्वाची जमात आहे महाराष्ट्राचा विचार करतात धनगर जात महाराष्ट्रात सर्वत्र आढळते पारंपारिक वेशभूषेत पारंपरिक जीवन जगणारे हे लोक महाराष्ट्राच्या समाज जीवनाशी एकरूप झालेले आहेत त्यांच्या देवदेवता विधी उत्सव आजही वैशिष्ट्यपूर्ण आहे धनगरांचा मुख्य व्यवसाय शेळ्या मेंढ्या पालनाचा आहे त्यातल्या त्यात पश्चिम विदर्भ हा सुरुवातीपासून मागासलेला आहे अशा मागासलेल्या भागात राहणाऱ्या धनगर समाजाची स्थिती फारशी चांगली दिसत नाहीधनगर समाजाला संपूर्ण भारतभर पसरलेला आहे प्रत्येक घटक राज्यात वेगवेगळ्या

नावाने समाज ओळखला जातो संपूर्ण भारतात धनगर समाजाची लोकसंख्या जवळपास 16% एवढी असल्याचे दिसून येते मुळात एकच परंतु विभिन्न पोट जाती असणाऱ्या या समाजाला संघटित होत आले नाही.

**धनगर जमाती विषयी अभ्यास**

भारतीय राजकारणाचा आणि समाज करण्याचा अभ्यास करताना जात हा घटक अतिशय महत्त्वाचा आहे याला अपवाद महाराष्ट्र ही नाही महाराष्ट्रात अनेक जाती आहेत यामध्ये मराठा ही एक नंबरला आहे या जातीचे वर्चस्व महाराष्ट्रातील राजकारणांवर दिसून येते ज्या समाजातील लोकसंख्या जास्त तेवढी त्या समाजाची राजकारणातील भागीदारी जास्त या नियमानुसार मराठा मुस्लिम व इतर समाजाची भागीदारी दिसून येते पण महाराष्ट्रात मराठा समाजाच्या पाठोपाठ धनगर समाजाची लोकसंख्या आहे पण त्या प्रमाणात या समाजाचा सत्तेचा वाटा दिसून येत नाही धनगर समाजाची निश्चित लोकसंख्या किती आहे याची माहिती मिळत नाही परंतु वेगवेगळ्या अभ्यास करणे याविषयी मांडलेले मते आहेत. डॉ.गाडगीळ डॉ.मल्होत्रा यांनी केलेल्या अभ्यासानुसार सण 1981 मध्ये म्हणजे एकूण राज्याच्या 60 टक्के इतकी धनगर समाजाची लोकसंख्या होती 2014 च्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धनगर समाजाचा आरक्षणाचा लढा अधिक तीव्र झाला होता या पार्श्वभूमीवर अनेक वर्तमानपत्रे व अभ्यास करणे धनगर समाजाच्या लोकसंख्येचे विश्लेषण केलेले दिसून येते 28 /8 /2016 रोजी आदिवासी धनगर साहित्य संमेलनात धनगर समाजाची लोकसंख्या ही अडीच कोटी तर मतदार हे दोन कोटी असल्याचे नोंदवले आहे हे प्रमाण महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या १८ टक्के एवढे दिसून येते यामध्ये 72 विधानसभा मतदारसंघात धनगर उमेदवार निवडून येऊ शकतो तर 113 मतदारसंघ धनगर बहुल आहे तर 13 लोकसभा मतदारसंघात धनगरांची लोकसंख्या ही दोन ते सहा लाख एवढी आहे असे मत नोंदवले आहे मी आणि माझा धनगर समाजाच्या पुस्तकात रामचंद्र घुटुकडे यांनी धनगर समाजाची महाराष्ट्रातील लोकसंख्या एक कोटी वीस लाख म्हणजे 18% एवढ ी सांगितली आहेत.

राजकारण ही अनेक व्यक्तींनी एकत्रितरित्या निर्णय घेण्याची प्रक्रिया होय असे म्हणता येईल प्रत्येक राष्ट्रांमध्ये सत्ता मिळवण्यासाठी देत चालवण्यासाठी अनेक नेते निर्णय घेतात त्यास राजकारण असे म्हणतात राजकारण नसते निवडणुकीपर्यंत मर्यादित नसते राजकारणाचा हेतू खूप मोठा आहे आपला देश किंवा राज्य कसे चालावे कुठल्या तत्त्वावर चालले पाहिजे याचा विचार मांडणे आणि त्या विचारांचा आग्रह धरून आणि ते पूर्ण करण्यासाठी सत्यतेने सत्य देण्यासाठी निवडणुका लढवणे त्या जिंकणे आणि त्या जिंकण्यासाठी आपला विचार लोकांना पटवून देणे व ते नंतर सत्यात उतरवणे म्हणजे राजकारण होय.

सामाजिक सांस्कृतिक भौगोलिक आर्थिक घटकांच्या प्रभावाने विशिष्ट विचार स्वीकारून विशिष्ट समाज समूह संस्था भूभाग यावर सत्ता मिळवण्यासाठी व सत्ता कायम ठेवण्यासाठी केलेले कृती म्हणजे राजकारण होय.

**उद्दिष्टे**

धनगर समाजाच्या राजकीय स्थितीचे अध्ययन करणे

धनगर समाजातील राजकीय नेतृत्वाचा अभाव

**संशोधन पद्धती**

पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यातील प्रत्येक जिल्ह्यातील 80 याप्रमाणे पाच जिल्ह्यातील चारशे कुटुंबप्रमुख म्हणून निवड करण्यात आली असून वेगवेगळ्या विचारवंतांनी मांडलेले विचार पुस्तक लेख संशोधन पेपर यांचा समावेश

**धनगर जमातीचा राजकीय अभ्यास**

धनगर समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात म्हणजे 8% सत्तेत वाटा मिळाला पाहिजे होता म्हणजे विधानसभेत जवळपास 22 आमदार निवडून यायला पाहिजे होते परंतु तसे प्रतिनिधित्व कोणत्याच पंचवार्षिक निवडणुकीत दिसत नाही महाराष्ट्र विधानसभेतील निवडणुकीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की 1962 1967 या विधानसभेच्या काळात गणपतराव देशमुख तुकाराम शेंडगे व यमाजी सातपुते हे तीन धनगर आमदार निवडून गेले 1967 ते 72 या काळात गणपतराव देशमुख व विठ्ठलराव नाईक हे दोन आमदार निवडून येऊ शकले १९७२ ते १९७८ च्या काळात गणपतराव देशमुख लेंगरे अण्णासाहेब व मल्हारराव माहुलकर हे तिघे निवडून

आले 1978 ते 1980 या काळात गणपतराव देशमुख अनंत कुमार पाटील आनंदराव देवकते हे निवडून आले 1980 ते 1985 या कालावधीत गणपतराव देशमुख व पारूताई वाघ हे दोघेच निवडून आले तर 1985 ते 1990 च्या कालखंडात गणपतराव देशमुख आनंदराव देवकते गणपतराव पाटील काकासाहेब थोरात पारूताई वाघ हे पाच आमदार निवडून आले 1990 ते 1995 या काळात गणपतराव देशमुख शिवाजीराव शेंडगे नाना कोकरे आनंदराव देवकते गणपतराव पाटील 1995 ते 1999 या काळात नाना कोकरे विठ्ठलराव नाईक आनंदराव देवकते पोपटराव गावंडे हे निवडून आले तर 1999 ते 2004 या कालखंडात गणपतराव देशमुख अनिल गोटे आनंदराव देवकते पोपटराव गावडे यांनी निवडून आले 2004 ते 2009 विधानसभेत गणपतराव देशमुख प्रकाश शेंडगे अनिल गोटे राम शिंदे व हरिदास भदे हे आमदार होते. 2014 मध्ये धनगर आरक्षण आरक्षणावरून संपूर्ण महाराष्ट्र समाजात एक्झिट करण्याचा प्रयत्न करण्यात आला या पार्श्वभूमीवर ही निवडणूक विशेष महत्त्वाची होती या निवडणुकीतही पाच पेक्षा अधिक धनगर समाजाचे आमदार निवडून येऊ शकले नाहीत सांगोला मतदारसंघातून विक्रम आणि गणपतराव देशमुख यांचा शेतकरी कामगार पक्षाकडून निवडून आले तर दत्तात्रय भरणे राष्ट्रवादी व नारायण पाटील हे शिवसेनेच्या तिकिटावर निवडून आले इसवी सन 1962 ते 2014 या कालावधीत निवडणुकांचा अभ्यास केला असता असे दिसून येते की पाच आमदारांपेक्षा कधीच संख्यासमोर गेलेली नाही तर विधान परिषदेत या समाजातील काही लोक निवडून दिलेत अण्णासाहेब डांगे माधवराव भिकाजी धायगुडे विजय हनुमंतराव मोरे प्रकाश शिवाजीराव शेंडगे रमेश शिवाजीराव शेंडगे ना धो महानोर अनंत कुमार किसनराव पाटील रामराव वडकुते रामहरी गोविंद रुपनवर व महादेव जानकर हे विधान परिषदेवर निवडून गेले यापैकी बोटावर मोजणे इतकेच लोक मंत्रीपदावर आढळून झाले अनंतराव देवकते शिवाजी बापू शेंडगे गणपतराव देशमुख अण्णासाहेब डांगे यांनी काही काळ मंत्रिपदे भूषवले आहेत तर सध्या प्राध्यापक राम शिंदे व महादेव जानकर हे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात आहेत भारतीय संसदेचा इतिहास पाहिला तर महाराष्ट्रात आजपर्यंत फक्त एकमेव लोकसभेत गेलेला उमेदवार म्हणजे रखमाजी गावडे तेही 1958 मध्ये बीड लोकसभा मतदारसंघातून तर महाराष्ट्रातून डॉ. विकास महात्मे हे राज्यसभेवर खासदार म्हणून निवडून आले होते लोकसंख्येचा विचार केला तर धनगर समाजाचे विधानसभेतील प्रतिनिधित्व अत्यल्प असल्याचे दिसून येते काही विचारवंत अभ्यासात या जमातीला भटकी जमात म्हणतात संस्कृत भाषेत धांगा शब्द आहे धान्याचा अर्थ डोंगर पर्वत असाच होतो.

पश्चिम विदर्भातील धनगर समाजाच्या राजकीय स्थितीचे अध्ययन केला असता असे लक्षात येते की राजकारणात आपल्या कुटुंबातील कोणीच नाही असे 83.25% लोक सांगतात त्याचबरोबर लोकांचे मुले राजकीय कार्यक्रमात सहभागी असल्याचे दिसून येते यावरून आजच्या एकविसाव्या आधुनिक युगात देखील लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर असून धनगर समाजातील लोक राजकारणात अत्यल्प आहे त्याचबरोबर भारतीय समाजावर जातीचा प्रभाव असल्यामुळे सत्तेपासून धनगर समाज अजूनही अलिप्त आहे पश्चिम महाराष्ट्रात पाच जिल्हे असून एकही आमदार धनगर समाजाचा निवडून आलेला नाही पूर्वी हरिदास भदे हे फक्त आमदार म्हणून निवडून आले होते.

## निष्कर्ष

धनगर समाजाचा विस्तार पाहिला तर धनगर समाज जगाच्या पाठीवर सर्वत्र विखुरलेला दिसतो शेळ्या मेंढ्या ढोरे पाडणारी मेष पालन करणारी जमात सर्वत्र दिसून येते भारतातही कन्याकुमारी ते कश्मीर पर्यंत जमात सर्वत्र आढळून येते प्रदेश प्रांत व भाषा परतवे धनगर जमातीस वेगवेगळ्या नावाने ओळखले जात असले तरी त्यांचे सामाजिक व्यावसायिक सांस्कृतिक गुणवैशिष्ट्य एकच असल्याचे दिसून येते. रानावनात निसर्गाशी ब्रह्ममान होणारा डोंगर दर्या खोऱ्यात धाडसाने राहणारा भरपूर शूर पण नम्रपणे वागणारा हा समाज आढळून येतो धनगर समाजाची राजकीय स्थिती किंवा राजकीय नेतृत्व निर्माण करण्यात आजच्या आधुनिकीकरणाच्या युगात देखील पाहिजे त्या प्रमाणात सत्तेचा वाटा त्यांना मिळत नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची**


1. चव्हाण रामनाथ 2018 भटक्या विमुक्तांची जात पंचायत खंड चार पुणे देशमुख अँड कंपनी पब्लिकेशन
2. कोकणे प्रणाम 2011 महाराष्ट्रातील धनगर अनुसूचित जमात पुणे श्री समर्थ प्रिंटर्स
3. भुजाडे होमेश 2005 धनगर समाज आणि परिवर्तन नागपूर सुधीर ग्राफिक्स
4. भोळे डॉक्टर भास्कर 2011 भारताचे शासन आणि राजकारण नागपूर पिंपळापुरे अँड पब्लिकेशन्स.
5. दळणकर शिवाजी परभणी जिल्ह्यातील धनगर समाजाच्या आर्थिक व सामाजिक अध्याय
6. घुटुकडे रामचंद्र 2017 मी आणि माझा धनगर समाज पुणे यशोदीप प्रकाशन